# सोयाबीन लागवड: पेरणी आणि लागवड पद्धत

डॉ. अमोल विरकर
कृषी विभाग
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

सोयाबीन पेरणी अंतर वाण व जमीनीचा प्रकार यानुसार लागवड / टोकण पद्धत/ सरी वरंबा/ BBF पेरणी/ योग्य लागवड पद्धत व पेरणी/ एकरी झाडांची संख्या / उत्पन्नाचे गणित.

सोयाबीन पिकाच्या उत्पादनवाढीसाठी शेतकरी नवनवीन प्रयोग करत आहेत, नवीन वाणांची लागवड करत आहेत, प्रामुख्याने सोयाबीन हे एक कमी खर्चात जास्त उत्पन्न देणारे महत्वाचे पीक झाले आहे. मुख्य पीक असल्याने शेतकरी उत्पादन वाढीसाठी नवीन तंत्रज्ञान गोष्टी करत असताना खर्च व वास्तविकता यांचा विचार करत नाहीत व त्यामुळे उत्पादन कमी होते. त्यामध्ये प्रामुख्याने @ लागवडीचे अंतर @ वाण निवड व जमीनीचा प्रकार आणि लागवडीची पद्धत @ पेरणीची पद्धत व पेरणीचे अंतर या गोष्टींचा एकरी सरासरी झाडांची संख्यावर खूप मोठा परिणाम होतो व त्याचा पीक चांगले येऊन उत्पादनावर परिणाम होतो, यामध्ये खूप मोठ्या चुका होतात व त्यामुळे शेतकरी मित्रांचे उत्पादन कमी होते व त्यात एक वर्ष निघून जाते.



फुले संगम

कोणत्याही पिकाच्या उत्पादवाढीसाठी त्याची एकरी झाडांची संख्या खूप महत्वाची असते त्यामुळे सोयाबीन पिकाचे जर आपल्याला चांगले उत्पादन घेयाचे असेल तर एकरी सरासरी झाडांची संख्या राखणे आवश्यक आहे (सरासरी १-१.५ लाख झाडे एकरी) फुले संगम किंवा इतर वाढणारे वाण असेल तर कमीत कमी ८० हजार असणे आवश्यक आहे. नेमकी हीच संख्या राखण्यात शेतकरी चुकतात / ते म्हणजे कोणीतरी लागवड केलेलि असते (२फूट x ६इंच) त्यामधे झाडांची संख्या ४४ हजार आणि दुसरे म्हणजे (You Tube) वरती असलेले व्हिडिओ, परंतु यात सामान्य शेतकरी भरडला जातो, त्याला सोयाबीन चांगले येवून सुध्दा अपेक्षित उत्पादन मिळत नाही व तो नाराज होतो याचे नेमके कारण म्हणजे @ एकरी असलेली झाडांची संख्या.

उदा. जर ४५ x १० सेमी वर लागवड केली तर (फुले संगमसाठी) एकरी ८८ हजार झाडे बसतात @ आपण ८० हजार पकडू @ एका झाडला सरासरी १०० शेंगा लागल्या म्हणजे २००-२५० दाणे म्हणजे सरासरी २५-३० gm प्रतीझाड @ एकूण संख्या ८० हजार म्हणजे ८०,००० x २५ gm = २० क्विंटल (३० टक्के घट पकडुन १४ क्विंटल एकरी सरासरी उत्पादन मिळणे अपेक्षित आहे) यांचे उलट आपण ६० x १५ सेमी वर लागवड केली तर @ एकरी झाडांची संख्या बसते ४४ हजार (आपण ४० हजार पकडू) @ प्रती झाड शेंगा सरासरी १५०-२०० म्हणजे ३००- ४०० दाणे म्हणजे ४० gm प्रती झाड एकरी ४०००० x ४० gm = १६ क्विंटल (२० टक्के घट पकडुन १२-१३ क्विंटल) परंतु जेव्हा तुम्ही दोन ओळी व दोन झाडातील अंतर जास्त ठेवणार आहात तेव्हा तेवढ्या प्रमाणात शेंगासुध्दा लागणे गरजेचे आहे, आणि त्यानुसार नियोजन करावे लागेल त्यामुळे यामध्ये रिस्क वाढत जाते त्यामुळे या ठिकाणी येव्हढेच सांगायचे आहे की जास्त अंतर ठेवू नये ४५ X ७-१० सेमी हे अतिशय चांगले अंतर सोयाबीनसाठी आहे.

४५ x ७-१० सेमी लागवड केल्यास @ प्रतीझाड १०० शेंगा @ २००-२५० दाणे @ २५-३० gm म्हणजे उत्पादन १५ क्विंटल अपेक्षीत आहे त्यामुळे अंतर आणि झाडांची संख्या खूप महत्वाचे आहे, त्यासाठी एकरी लागणारे बियाणे - २२-२५ किलो (८५-९० टक्के उगवण क्षमता असलेले) २५-२७ किलो (७५ टक्के उगवण क्षमता असलेले)



हे वरील सर्व फुले संगम, फुले किमया आणि MAUS ६१२ अशा उंच वाढणाऱ्या वाणांसाठी आहे. पेरणी करताना जर आपली जमीन हलकी व मध्यम असेल तर लवकर येणारे वाण @ ३८x७-१० सेमी याप्रमाणे पेरणी करावी (एकरी २५-२७ किलो बियाणे उगवण क्षमता बघून) आपल्याला जर बेडवर लागवड करायची असेल तर आपल्याकडे सिंचन व्यवस्था असणे आवश्यक आहे म्हणजे ड्रीप किंवा इतर पद्धतीने पाणी व्यवसथापन करता येईल तरच बेडवर लागवड करावी.

सरी पाडून बेडवर जर लागवड करणार असाल तर बेड ३ ते ३.५ फूट पाडून बेडच्या दोन्ही बाजूला लागवड करावी, म्हणजे दोन ओळीतील अंतर ४५ सेमी आले पाहिजेत.

जर बेडच्यावरती लागवड करणार असाल तर बेडची उंची कमी करून सपाट बनवून वरती ४५ सेमी अंतर ठेवून लागवड करावी जेणकरून एकरी झाडांची संख्या राखली जाईल. बेडवर लागवड केली तर बऱ्याच वेळा सोयाबीन जास्त पाऊस झाला तर पडते, त्यामुळे बगेला लागवड करावी व आपली सोयाबीन जास्त प्रमाणात वाढणार नाही याची काळजी घ्यावी, बेडवर लागवड केल्यास आणि पावसाने दडी मारली तर सोयाबीन लवकर सुकते व त्यामुळे जर पाणी देणे शक्य नसेल तर उत्पादन मिळत नाही त्यामुळे बेडवर लागवड केल्यास ड्रिपची किंवा इतर पाणी देण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला तर सोयाबीन पेरणी व लागवड आपल्याकडे असलेल्या जमीन / वाण व पाण्याची उपलब्धता यांचा विचार करून व्यवस्थापन करावे. महागडे बियाणे आणि पावसाची अनिश्चितता यांचा विचार केला तर लागवड केली तर ३०-३५ टक्के बियाणे कमी लागते व झाडांची संख्या व्यवस्थित राखली जाते.

पेरणीसाठी BBF यंत्राचा वापर करणे अधिक योग्य व सोपे आहे कारण नवीन आलेल्या BBF यंत्रांनी सारख्या अंतरावर पेरणी केली जाते व समान खोलीवर दाणा पडतो त्यामुळे उगवण अतिशय चांगली होते, तसेच कमी जास्त प्रमाणात पाऊस झाल्यास, मूलस्थानी जलसंधारण होऊन पीक अतिशय चांगले येते व उत्पादनसुद्धा चांगले मिळते. जास्त पाऊस झाल्यास जर शेतात पाणी साचून राहत असेल किंवा पाणी वाहत असेल, तर बेडवर लागवड करावी किंवा BBF ने पेरणी करावी त्याचा फायदा होतो. पेरणी केली असेल आणि सोयाबीन दाट झाली असेल तर विरळणी करणे आवश्यक आहे व वाढ नियंत्रित राहिली असे नियोजन करावे. नत्रयुक्त खतांचा योग्य वापर करावा.

लागवड करताना एक ठिकाणी २-३ दाणे याप्रमाणे लागवड करावी.

विद्यापीठाच्या शिफारसीनुसार अंतर ठेवून लागवड करावी: हलकी जमीन असेल तर ३०x१० सेमी किंवा ३८x७-१० सेमी (लवकर येणारे वाण), भारी जमीन असेल तर ४५x७-१० सेमी पेरणी किंवा बेडवर लागवड किंवा रूंध-सरीवरंबा पद्धतीने लागवड करावी, लागवड करण्यासाठी दोन ओळींतील अंतर जास्तीत जास्त ४५-५० सेमी ठेवावे त्यापेक्षा जास्त अंतर ठेवू नये (एकरी झाडांची संख्या कमी होते), तसेच फुले संगम किंवा फुले किमया या वाणांची लागवड करत असाल तर दोन ओळींतील अंतर ४५ सेमी ठेवणे आवश्यक आहे. परंतू फुले संगम किंवा किमया यांची पेरणी दाट होणार नाही याची काळजी घ्यावी. नवीन वाण, नवीन पद्धती यांचा अवलंब नक्कीच करावा परंतु त्यांची वास्तविकता बघणे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे, कारण कोणत्या वाणाला कशाप्रकारची जमीन व किती अंतर ठेवावे लागते हे बघूनच लागवड करावी जेणकरून आपले नुकसान होणार नाही.

वरीप्रमाणे सर्व गोष्टी सोयाबीन लागवड/ पेरणी करत असताना लक्षात ठेवणे आवश्यक आहे व त्यानुसार नियोजन करून आपल्याला जास्तीत जास्त उत्पादन कसे मिळेल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. हे सर्व शेतकरी हितार्थ माझे वयक्तिक अनुभव व माहिती यानुसार लिहिले आहे, कुठेही संदर्भ म्हणून वापर करू नये व पिकाचे उत्पादन हे जमीन : वातावरण : नियोजन : व्यवस्थापन व वाण यावर अवलंबून असते.

(संपर्क: +९१ ९८९०६७८२७५)

★ ★ ★

(पान क्रमांक १२ वरून...)

### असे आहेत करटोलीचे औषधी उपयोग:

- करटोलीला जून ते ऑगस्ट महिन्यात फुले व त्यानंतर फळे तयार होतात.
- करटोलीच्या स्त्रीजातीच्या वेलीचे कंद औषधात वापरतात. कंद लंबगोलाकार, पिवळट-पांढरे असून, त्यावर गोल कंकणाकृती खुणा असतात व त्यांची रुची तुरट असते. कंदात रेचकपणा नाही, पण थोडासा रक्तसांग्राहिक धर्म आहे. मात्रा मोठी झाल्यास उलटी होते.
- करटोली हे डोकेदुखीवरील उत्तम औषध आहे. डोकेदुखीत पानांचा अंगरस, मिरी, रक्तचंदन आणि नारळाचा रस एकत्र करून चोळतात.
- रक्तार्शात कंदाचे चूर्ण देतात. कंदाचे चूर्ण व वंगभस्म मधुमेहात देतात. डोक्याचा त्रास, मुतखडा, सर्व प्रकारची विषबाधा, हत्तीरोग या विकारांत कंदाचा वापर करतात.
- करटोलीचे भाजलेले कंद मूळव्याधीत रक्तस्राव थांबविण्यास आणि आतड्यांच्या तक्रारीत उपयोगी आहे. कंद कफोत्सर्जक आणि थंडी वाजून येणाऱ्या तापात उपयुक्त आहे. पाने कामोत्तेजक व कृमिनाशक असून, त्रिदोष, ताप, बद्धकोष्ठता, दमा, श्वासनलिका दाह, उचकी, मूळव्याध यात गुणकारी आहेत.
- करटोलीचे फळ कडू, उष्ण, संसर्गरक्षक, दीपक आणि थोडे विरेचक आहे. वात, कुष्ठरोग, मूत्रस्राव, प्रमेह व मधुमेहात करटोलीची फळे उपयुक्त आहेत.

(उर्वरित पान क्रमांक २३ वर...)